# निवडणूक आयोगाने उमेदवाराने माहिती देणे बंधनकारक केले

नुकत्याच दिलेल्या कोर्टाने निकालामुळे निवडणूकीकरता अर्जाबरोबर आपली सांपत्तिक तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी लिखीत स्वरूपात स्षट केली पाहिजे अशी सूचना निवडणूक आयोगाने काढली. या मध्ये या कारणावरून अर्ज फेटाळला जाईल किंवा रद्द केला जाईल असे म्हटले नाही. तरी सुद्धा लोकसभे मध्ये अभूतपूर्व एकी दिसून आली. एकूणएक सदस्यानी काळजी प्रकट केली. अशी एकी 'कारगील' संग्रामाच्या वेळी सुद्धा दिसली नाही. म्हणजे असे समजावयाचे काय की 'कारगील संग्राम' ह्या समस्येपुढे गौण आहे. दहशतवाद्या विरूद्ध सुद्धा अशी एकजूट दिसून येत नाही. वर्तमान पत्रातून सुद्धा तुरळक चर्चा दिसून आली. दै. सकाळ मध्ये एक दिवशी संपादकीय व थोड्या दिवसानी वाचकांच्या पत्रव्यवहारात एक पत्र छापून आले. फारशी चर्चा झालीच नाही. लोकसभेत या विरूद्ध कायदा पास होईल. अगदी एकमताने. काहीही चर्चा न होता. आणि सर्वोच्य न्यायालयाच्या प्रयत्नाना खीळ घातली जाईल.

या मध्ये पक्त माहिती द्यायची आहे. निवडणूक आयोगाने शहानिशा करायची नाही. उमेदवाराने दिलेल्या माहिती वरून आयोगाने कारवाई  करायची आहे. जर चुकीची माहिती दिली किंवा आर्धवट माहिती दिली तर त्याचे परिणाम उमेदवाराला नंतर भोगावे लागतील. या मध्ये अक्षेपार्य काय आहे?

माझ्यामते जनतेनेच कृती करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक नागरिकाने रस घेऊन निवडणूकीतून शुद्ध चारित्र्याचे उमेदवारच निवडून येतील याची दक्षता घेतली पाहिजे. निवडून आल्यावर पक्षबदल करू नये याबद्दल सभासदावर दबाव आणला पाहिजे. आणि या गोष्टी कशा साध्य होतील यावर विचार मंथन झाले पाहिजे. माझे विचार खाली दिले आहेत.

- उमेदवाराने ०.१ टक्के मतदार यादीतील मतदाराकडून शिफारसपत्र घ्यावे.
- शिफारसपत्रावर सही किंवा अंगठा करणाऱ्या मतदाराचे मतदारसंघातील बँकेमध्ये खाते असलेच पाहिजे, जेंकरून त्यांची सही किंवा अंगठा तपासून पाहचा येईल.
- जर एखाद्या मतदाराने एकापेक्षा जास्त उमेदवारांची शिफारस केली असेल तर सर्वच उमेदवाराबाबत त्याची शिफारस रद्द ठरवून त्या निवडणूकी पुरता त्या मतदाराचा मतदानाचा हक्क रद्द करावा,
- कोठल्याही व्यक्तीला अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्या करता अर्ज भरण्याच्या दिवशी सलगपणे ६ वर्षे कोठल्याही पक्षाची सदस्यता नसालीच पाहिजे. तसेच एखाद्या पक्षातर्फे निवडणूक लढवणार असेल तर त्या पक्षाचा अर्ज भरण्याच्या दिवशी सलगपणे ६ वर्षे सदस्य असलाच पाहिजे.
- निवडून आल्यावर जर पक्ष बदलला किंवा पक्ष सोडला किंवा पक्षात प्रवेश केला तर त्याचा राजीनामा गृहित धरावा व त्याचे गृहाचे सदस्यत्त्व आपोआप रद्द समजावे.
- पक्ष सदस्याला पक्षातून काझून टाकण्यास न्यायालयाची मान्यता पक्षावर बंधनकारक असावी.
- हे नियम लागू करण्याची तारीख ३ महिने अगोदर प्रसिध्द करावी.
- त्या तारखेच्या अगोदर ज्यानी पक्षांतर केले अ,ल किंवा पक्षप्रवेश केला असेल किंवा पक्ष सोडला असेल किंवा अपक्ष असेल तर ६ वर्षाचा कालावधी लागू करू नये. म्हणजेच लागू होणाऱ्या तारखेनंतर निष्ठा बदलणारानाच हे नियम लागू करावेत.